1171

1171 -
PAVĀR (Nārāyaṇ Khaṇḍerāv)
Saradāra Bhagatasiṅgācā povāḍā.
Mumbaī: Samrāṭa Vaibhava Presa, 1931.
4 p. 22 cm.
2 nationalistic ballads, one in praise of Bhagat Singh, the other on Bābū Gen0.

NAI 1354
PP Mar D 6/1

NATIONAL ARCHIVES OF INDIA

PP-MAR-D 5/1

PROPERTY OF THE NATIONAL ARCHIVES OF INDIA

॥ वंदे मातरम् ॥

सरदार भगतसिंगाचा पोवाडा.

लेखकः— नारायण खंडेराव पवार

सन १९३१

किंमत अर्धा आणा.

मुद्रक सम्राट वैभव प्रेस, ११ खेतवाडी मुंबई ४

सरदार भगतसिंगाचा पोवाडा

(चाल:— लढनेवाला)

हिंमतवाला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ धृ ॥
आला भगतसिंग मैदानीं ।
मृदु शय्या दिली सोडोनी ।
परक्यांच्या जाचातूनी ।
पार होण्याला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ १ ॥
परकीय आले देशांत ।
व्यापारी साऱ्या वेशात ।
मातृभूमि पडली जाचात ।
मुक्त करण्याला संग्रामीं झुंजुनी गेला ॥ २ ॥
किती अर्धपोटीं तडफडती ।
बी. ए. ला नोकरी न मिळती ।
गाढण्या अशी अवनीति ।
लढा लढवीला । सग्रामीं झुंजुनी गेला ॥ ३ ॥
पोसण्या गोरें लष्कर ।
कर वाढे गरिबावर ।
अन्याय झाला अनिवार ।
दुःख हरण्याला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ ४ ॥
दीनांची हाक ऐकीली ।
गरीबांचा झाला वाली ।
देशाला वैभवशाली ।
पुन्हा करण्याला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ ५ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तो भगतसिंग सरदार ।
सुखदेव, राजगुरु वीर ।
क्रांतिचा लढा लढणार !
गेले फारिला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ ६ ॥
लढवय्ये क्रांतिच थोर ।
नाव झाले अजरामर ।
इतिहासीं खास राहणार ।
कीर्ति लोहिण्याला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ ७ ॥
धन्य तें शहर लाहोर ।
वीरांचे खरे माहेर ।
रोविला झेंडा भू-वर ।
वाले किल्याला । संग्रामीं झुंजुनीं गेला ॥ ८ ॥
स्वातंत्र्य युद्ध राष्ट्रांत ।
चालले डाव पेंचात ।
नका राहुं बंधुनो स्वस्थ ।
चला लढण्याला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ ९ ॥
कवि नारायण व्हा सिद्ध ।
लढविण्या अगामी युद्ध ।
गत वैभव जें प्रसिद्ध ।
प्राप्त करण्याला । संग्रामीं झुंजुनी गेला ॥ १० ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सत्याग्रही वीर—बाबू गेनूचा पोवाडा.

(चाल:—धन्य शिवाजी.)

बाबु गेनुने सत्याग्रहामधे, मात किती केली ।
धैर्य पाहुनी, मुंबई नगरी, थरथरुनी गेली ॥ १ ॥
मृत्यु भयाच्या ठिकऱ्या केल्या, रणीं गर्जणाऱ्या ।
मोटारीचे चक्कर फिरले, देहावर साऱ्या ॥ २ ॥
धन्य मराठ्या, वीरा, पुरा तुं सत्याग्रह केला ।
रसरसणारे तेज दाविले, मदांध सत्तेला ॥ ३ ॥
अद्भुत स्फूर्ति हृदयाची त्वां, दाखविली आज ।
अशस्त्रतेच्या, शांति युध्दाची राखिलीस लाज ॥ ४ ॥
हिंद भूमिच्या स्वातंत्र्यास्तव, दिव्य कार्य केले ।
धिक्कारुनि क्षण भंगुर जीवित, स्वात्म्या अर्पियले ॥ ५ ॥
कडकड करि बहु मेघ जसा, गडगडाट गगनांत ।
त्या मेघासम तुझी धडाडी, वर्णितो कवनास ॥ ६ ॥
सत्याग्रह तव, खळखळला जव, सिंधूची लाट ।
पहावया तव वदन मिळे ना, कुणालाही वाट ॥ ७ ॥
राष्ट्र सेवेची हाव धिरा बहु, ठाव न लिहिण्याला ।
सजिव मर्दी बहु जगतीं असती, व्यर्थचि पहाण्याला ॥ ८ ॥
स्वातंत्र्यस्तव देह अर्पिला, भ्याला न मरणाला ।
टक्कर घेण्या लोंडी चाले, धैर्याचि पहाण्याला ॥ ९ ॥
मेरुसम त्या धैर्यधरा नसे, फिकिर रणीं कसली ।
खदखद हसरी मुद्रा त्याची, सर्वांना दिसली ॥ १० ॥
रणांगणीं जो स्वरक्त देण्या, वीर सज्ज झाला ।
निज प्राणाची देउनि आहुति, बोल पुरा केला ॥ ११ ॥
भू—गोलावरी पक्षा विराज्या, नाथाचे स्मरण ।
गर्जत राहिल बाबू गेनू, रोड आ—मरण ॥ १२ ॥
अजरामर हें नांव मिळविलें, धन्य शुरा थोर ।
अमर मरण मिळवुनि राहिला, अढळपदीं स्थीर ॥ १३ ॥
अमोल्य करणी करुनि भूवरी, परलोकीं गेला ।
धीर भेटण्या गेला धाले, यतिंद्र दासाला ॥ १४ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA